संदर्भ क्र.१) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचेकडील आदेश क्र.लेखा/१४/कावि/३५७/२०२० दि.२६/०५/२०२०
२) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/११६८/२०२० दि.२०/०६/२०२०
३) मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड मनपा यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/१२८२/२०२० दि.०२/०७/२०२०

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८, **लेखा विभाग**
क्र.लेखा/१४/कावि/४८६ / २०२०
दिनांक ०३/०७/२०२०

**विषय:- कोरोना विषाणू Covid-19 प्रतिबंधात्मक उपाय अंतर्गत लेखा विभागाचे कार्यालयीन कामकाजाबाबत....**

**परिपत्रक,**

उपरोक्त संदर्भिय वाचले क्र.१ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखा विभागातील कोरोना विषाणू **Covid-19** प्रतिबंधात्मक उपाय अंतर्गत लेखा विभागामध्ये देण्यात येणा-या देयकांची स्विकृती व आक्षेपित देयके घेण्यासाठी लेखा विभागाचे कॅश काऊंटर / चेक वाटप काऊंटर बाहेरून खिडकीद्वारे देयके घेण्यास व देण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच मा.आयुक्त यांनी वाचले क्र.२ व ३ च्या आदेशान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये नागरिक, ठेकेदार यांना अपरिहार्य व इतरांना प्रवेश निषिध्द केलेला आहे.

पिंपरी चिंचवड मनपा कार्यक्षेत्रात कोरोना विषाणु **Covid-19** च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे रूग्णसंख्येत मोठ्या प्रमाणात होत असलेली वाढ,तसेच मनपा कार्यालयामधील कर्तव्यावरील कर्मचारी/अधिकारी "कोरोना" बाधित होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. असे असताना देखील लेखा विभागात पिं.चिं.मनपाचे कर्मचारी/ अधिकारी हे देयके किंवा धारिका प्रत्यक्ष विभागात येवुन सादर करतात. परंतु सदरची देयके/धारिका या बाहेरील खिडकीद्वारे देणे बाबतचे आदेश मा.आयुक्त यांनी संदर्भ क्र.१ अन्वये निर्गमित केले आहेत.

सबब, पिंपरी चिंचवड मनपाच्या सर्व विभागप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी कृपया आपल्या कार्यलयातील सर्व संबंधित कर्मचा-यांना देयके/धारिका ह्या देयके स्विकृती खिडकीद्वारे बाहेरील बाजुकडुनच लेखा विभागास सादर करणेबाबत सुचना देण्यात याव्यात. कोरोना विषाणु **Covid-19** चा वाढता प्रादुर्भाव विचारात घेवुन तसेच लेखा विभागाची जागा अपुरी पडत असल्याने लेखा विभागामध्ये मोठी गर्दी होत आहे. सदर अनावश्यक गर्दी/वावर कमी करण्याच्या दृष्टीने व कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव कमी होण्याच्या अनुषंगाने लेखा विभागामध्ये देण्यात येणा-या देयकांची स्विकृती व आक्षेपित देयके घेण्यासाठी लेखा विभागाचे कॅश काऊंटर / चेक वाटप काऊंटरवर बाहेरून स्विकारणेची सोय केली आहे.

तरी आपल्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना तशा सुचना द्याव्यात. तसेच लेखा विभागाशी संबंधित टपाल/पत्रव्यवहारासाठी दुरध्वनी/भ्रमणध्वनी,ई-मेल व व्हाट्सपचा वापर करावा.

(जितेंद्र कोळंबे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११०१८

प्रति,

सर्व संबंधित विभागप्रमुख/शाखा अधिकारी

Scanned by CamScanner